# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक ०९.०६.२०२६ मंगळवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :–**

दिनांक ०८.०६.२०२६ रोजी मा. ११ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ८, नागपुर, श्रीमती सोनाली बिरारी–जगताप यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. १७५०/२०२३ मधील, पोलीस ठाणे कोतवाली येथील अप. क्र. ६९/२०२३ कलम ४१९,४२०,४६५,४६७,४६८,४७१ भादंवि या गुन्ह्यातील आरोपी १) विजय रामचंद्र पटवर्धन उर्फ विजय राजेंद्र रणसिंग वय ३२ वर्षे व त्याची फरार पत्नी २) चंद्रलेखा विजय रणसिंग वय ३० वर्ष रा. मु.पो. यरमाळा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद, ह.मु. हाजीयानी मंजील, संगम कापड दुकानाजवळ, माहुर, जि. नांदेड यांचेपैकी आरोपी क्र. १ याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ४२०,४६७,४६८,४७२ भादंवि मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/– रू. दंड आणि दंड न भरल्यास एक महिना अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम ४७१,४६५,१७० भादंविमध्ये ०२ वर्षे सश्रम कारावासाची तसेच कलम १७१ भादंवि मध्ये ०३ महिने साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०४.०३.२०२३ चे १५.०० वा २१.०० वा. चे दरम्यान, आरोपी यांनी स्वत:चे बनावट आधारकार्ड तयार करुन आरोपी क्र. १ याने स्वत:चा डेस्क तथा सर्वेक्षण अधिकारी नागपूर तथा औरंगाबाद खंडपीठ या पदावर नेमणूकीस असल्याचे बनावट ओळखपत्र तयार केले तसेच यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयात बनावट दस्तऐवज सादर करुन कार्यालयात खोली प्राप्त केली व तेथील कार्यालयात काही लोकांना बनावट नियुक्तीपत्र देऊन नौकरीवर ठेवले. तसेच आरोपींनी यवतमाळ, अमरावती, नांदेड येथील जिल्हा न्यायालयात नौकरी लावून देतो असे उमेदवारांना सांगून त्यांचेकडून परिक्षेचे फार्म भरुन घेऊन उमेदवारांना बनावट ओळखपत्रे दिली व एकूण २०,००,०००/– घेऊन त्यांची फसवणूक केली. आरोपी यांनी आदर्श विद्या मंदीर नागपूर येथे परिक्षा घेण्याकरीता बनावट पत्र तयार करुन शिक्के मारुन सादर केले. व पोलीस ठाणे कोतवाली येथे परिक्षा केंद्राकरीता दोन होमगार्ड मिळणेकरीता बनावट पत्र तयार करुन सादर करुन फसवणूक केली. याप्रकरणी पोलीस निरीक्षक मुकुंद ठाकरे पोलीस ठाणे कोतवाली यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे दोन्ही आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपी क्र. १ यास दिनांक ०५.०३.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी पोउपनि नवनाथ देवकाते यांनी मा. कोर्टात तपासाअंती आरोपी क्र. १ याचेविरुध्द दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. सौ. निलीमा देवगिरकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्रीमती स्नेहल पखिडे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी सफौ. नितीन व गणपती यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०८.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये १२ ईसमांवर कारवाई करून ९,२२,७८५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये १६ ईसमांवर कारवाई करून ५,७३,०३९/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,००२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,३३,७५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— ऑनलाईन लॉटरीवर जुगार खेळविणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.०६.२०२६ रोजी, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत लालगंज, चकना चौक येथे शासन प्रतिबंधीत ऑनलाइन लॉटरीद्वारे जुगार खेळवत आहेत. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून तेथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, आरोपी क्र. १) सचिन दिलीप रहांगडाले वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्र. १०३, नवीन नगर, भवानी मंदीरजवळ, पारडी, नागपुर २) अनिकेत मोरेश्वर वकालकार वय २१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४३, नवीन नगर, पारडी, नागपुर हे समक्ष पाहिजे आरोपी नामे सागर लिलाधर धनजोडे याचेसह संगनमत करुन स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता लोकांकडून पैसे स्विकारुन शासन प्रतिबंधीत ऑनलाईन लॉटरीवर पैश्याची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळवितांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख १,८३०/—रू., वेगवेगळे ०७ गेमिंग मशिन, मॉनिटर, प्रिंटर, स्कॅनर, सि.पि.यु., कि—बोर्ड, ०२ मोबाईल फोन व ईतर साहित्य असा एकुण २,९३,७४०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे शांतीनगर येथे कलम ४,५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव शाांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.०६.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०७.०६.२०२६ चे २१.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट नं. ९०, श्रीनगर, दर्शन कॉलनी, नंदनवन नागपुर येथे राहणारे फिर्यादी सुरेश जानबाजी आकरे वय ६२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह द्वारका, सोमनाथ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आत प्रवेश करुन, लोखंडी आलमारीतील रोख ४५,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,३१,८००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे मपोउपनि. सपकाळ ८१४९७७९२७६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :– घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०८.०६.२०२६ चे २३.०५ वा. चे सुमारास, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, बिल्डींग क्र. १४, म्हाडा कॉलनीसमोर रोडवर एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक ईसम धुमधाम करतांना दिसल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी तलवार काढुन घेतली. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव गगनदीपसिंग मंजीतसिंग सहोता वय ३३ वर्षे रा. म्हॉडा कॉलनी, बिल्डींग क्र. १४, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी तलवार कि. ३५०/– रू. ची जप्त करण्यात आली.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे तहसील :–** सौ. शिवानी मनिष गोखले वय २७ वर्षे, रा. खरबीकर मोहल्ला, वाघाचे मठाजवळ, गोळीबार चौक, नागपूर ह्या दिनांक ०५.०६.२०२६ चे १८.३० वा. पासुन पोलीस ठाणे तहसील हद्दीतील वडीलांचे राहते घरी कोणाला काहीही न सांगता मुलगी नामे कायरा वय ०६ वर्ष हिचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट २ इंच, केस–काळे लांब, अंगात– काळा टिशर्ट व काळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. मुलीचे वर्णन– **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–सडपातळ, उंची– ३ फुट २ इंच, केस–काळे, अंगात– पांढरा फ्रॉक घातलेला आहे. भाषा– मराठी बोलते.

**२) पोलीस ठाणे यशोधरानगर :–** सौ. छमन महेंद्र मेहर वय ३१ वर्षे रा. गांधी पुतळा, विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपूर ह्या दिनांक ०३.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता मुलगी मैथिली वय ११ वर्ष व मुलगा नामे मानिष वय ०७ वर्ष यांचेसह कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची– ५ फुट, केस–काळे, अंगात– पिवळया रंगाची साडी घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे अजनी</u> :—** कु. खुशी विनायक राऊत वय १८ वर्षे रा. गली क्र. १०, बाभुळखेडा, अजनी नागपूर ही दिनांक १९.०५.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्‌दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लहान, अंगात— गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.


सौ. शिवानी


कायरा


सौ. छमन


मानिष


मैथिली


कु.खुशी

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**